MHKO180002822026

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.१५७/२०२६**
**महाराष्ट्र सरकार वि. अविनाश विलास खंडागळे**

**:: न्या य नि र्ण य ::**
**निशाणी क्र.०६ लगत.**
**(अधिघोषित दिनांक ०७.०८.२०२६)**

अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ हे गैरहजर. आरोपीतर्फे विद्यमान वकील श्री. शु.वि.बेले यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थीत झालेले मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे :–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी पोलीसांना आरोपीच्या ताब्यामध्ये देशी दारुच्या बाटल्या विनापरवाना बेकायदेशिररित्या मिळून आल्या, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच मोहन शांतीनाथ माणगावे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०६ लगत नोंदविली आहे. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उर्वरित साक्षीदारांना साक्षीपुराव्याकामी न्यायालयासमक्ष हजर केले नसल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.०१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीस गुन्ह्यात गोवण्याईतपत साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**:: कारणमिमांसा ::**

**मुद्दा क्र.१ करीता** :–

०४. विद्यमान सहाय्यक सरकारी वकील हे गैरहजर असल्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३४६ अन्वये पंच मोहन यांचा साक्षीपुरावा न्यायालयामार्फत नोंदविण्यात आला.

०५. पंच मोहन यांनी दिनांक ०४.०३.२०२६ रोजी पोलीसांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यामुळे, पंच मोहन यांच्या एकुण साक्षीपुराव्यातुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना आणि घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार पोलीस शिपाई सचिन क–याप्पा पुजारी, तपासीक अंमलदार तथा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार अनिल बाळु चव्हाण, नमुना वाहक महिला पोलीस शिपाई निशिगंधा तानाजी शेटके व पंच शरद यशवंत पवार यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास लेखी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आले नाहीत. तसेच, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास साक्षीपुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि तपासीक अंमलदार चव्हाण व पंच शरद यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०७. महत्वाचे म्हणजे, अभियोगपक्षाने रासायनिक पृथ्थ:करण अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे, तपासीक अंमलदार चव्हाण यांनी आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल निश्चितपणे देशी दारुच होती किंवा काय, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाने उपरोक्त नमूद साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली असती तरी जोपर्यंत घटनेवेळी आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला तथाकथीत मुद्देमाल निश्चितपणे देशी दारुच होती, ही बाब अभियोगपक्ष रासायनिक पृथ्थ:करण अहवालातुन संशयापलीकडे सिध्द करत नाही तोपर्यंत आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द होवू शकत नाही.

०८. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे तसेच तक्रारदार, तपासीक अंमलदार चव्हाण, नमुना वाहक महिला पोलीस शिपाई शेटके, पंच शरद व उर्वरित साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी व रासायनिक पृथ्थ:करण अहवालाअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास

आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :-

०९. अभियोगपक्षाचा एकुण साक्षीपुरावा आहे असा जरी वाचला तरी आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देवून त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. आरोपी अविनाश विलास खंडागळे यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कद्बे रद्द करण्यात येतात.

३. ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे, कुरुंदवाड यांनी जप्त मुद्देमालातील देशी दारुच्या बाटल्यांचा अपिलीय कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता सदर मुद्देमाल मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १०० व १०१ अन्वये पाठवावा.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/- किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचे एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.08.07 17:44:50 +0530

दिनांक : ०७.०८.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.